## निशाणी क्र. ३५ च्या अर्जावर आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज आरोपी **शेखर गजानन धरमकार** याने त्यास नियमित जामीनावर सोडावे याकरीता दिला आहे. त्याचे कथन असे की, नांदुरा पोलीस ठाण्यात त्याच्याविरुध्द गुन्हा क्र. २२६/२०१८, भारतीय दंड संहीतेचे कलम ३५३, ३३२, ४२७ आणि ५०४ आणि मोटार वाहन कायदा कलम ३(१)/१८१ अन्वये दाखल आहे. सदर प्रकरणात तो न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे दिनांक २६/०८/२०२४ रोजी त्यांस बुलढाणा येथील कारागृहात पाठविण्यात आले आहे. तो मागील ७० दिवसांपासून कारागृहात असल्यामुळे त्याची लहान मुले आणि पत्नी यांची उपासमार होत आहे. तो घरातील एकटा कमविता पुरुष आहे. तरी त्याला जामीनावर सोडावे.

२) या अर्जास सरकार पक्षाने त्यांचे लेखी म्हणणे अर्जाच्या पाठीमागे हस्ताक्षरात दिले आहे. त्यात त्यांचे कथन असे की, पूर्वीच्या जामीनाची रक्कम वसूल करुन योग्य ते पुढील जामीनाचे आदेश करावेत.

३) दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४) खटल्याची सद्यस्थिती पाहता त्यामध्ये तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. आरोपीस गैरहजर राहत असल्याने अटक अधिपत्र बजावणी करुन ताब्यात घेण्यात आले होते. तदनंतर त्याने आजपर्यंत जामीन अर्ज

दाखल केला नव्हता. आरोपीविरुध्द कथित अपराधांचे स्वरुप पाहता त्यास न्यायचौकशीदरम्यान कोठडीत ठेवणे प्रचलित कायद्यास अनुसरुन ठरणार नाही. त्यामुळे त्यांस पुन्हा जामीनावर मुक्त करावे लागेल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर केला आहे.

२. अर्जदार **शेखर गजानन धरमकार** यांच्या विरुध्द **नांदुरा** पोलीस ठाण्यात **गुन्हा क्र. २२६/२०१८, भारतीय दंड संहीतेचे कलम ३५३, ३३२, ४२७ आणि ५०४ आणि मोटार वाहन कायदा कलम ३(१)/१८१ अन्वये** दाखल झालेल्या गुन्ह्यात अर्जदार यांने रक्कम रुपये ३०,०००/– (अक्षरी रुपये तीस हजार मात्र) चा लायक जामीन आणि तितक्याच रकमेचे बंधपत्र द्यावे.

३. अर्जदाराने न्यायालयात प्रत्येक तारखेवर नियमित हजर राहावे.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2024.11.04 17:58:39 +0530

मलकापूर.
दिनांक – ०४/११/२०२४.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर

– – – – –

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेश हा मूळ आदेशाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर. |
| लघुलेखिकेचे नांव | :- | कु. एच.डी. चौधरी, लघुलेखक श्रेणी १. |
| आदेशाचा दिनांक | :- | ०४/११/२०२४. |
| आदेशावर सही केल्याचा दिनांक | :- | ०४/११/२०२४. |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०४/११/२०२४. |